MHSO100000942017

<u>नि.द.क्र.०८/२०१७ मधील निशाणी क्र.४४ खालील आदेश</u>

हुकूमनामाधारकांनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.१ रमेश नारायण ढाळे याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ हा ता.०४.०१.२०२४ रोजी मयत झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ याच्या नावापुढे मयत असे लिहिण्यासाठी व प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी सोबत अर्ज दिलेला आहे. वादी ही तिच्या सासरी राहत असल्यामुळे प्रतिवादी क्र.१ हा मयत झाल्याचे त्यांना ७/१२ सदरी वारस घेतल्यानंतर माहित झाले. प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास १७ महिने, ०३ दिवसांचा झालेला आहे. सदरचा विलंब जाणीवपुर्वक झालेला नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास न्यायनिर्णीत ऋणको यांनी नि.क्र.४५ वर जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन त्याबाबत योग्य व संयुक्तीक कारण दिले नाही. प्रतिवादी क्र.१ हा मयत झाल्याचे हुकूमनामाधारकांना माहिते होते. हुकूमनामाधारकांनी जाणीवपुर्वक प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास हलगर्जीपणा केलेला आहे. म्हणून सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे.

**नि.क्र.४४ खालील आदेश**

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबतः-**

४. मी हुकूमनामाधारकांतर्फे विद्वान वकील श्री.कुलकर्णी व न्यायनिर्णीत ऋणकोतर्फे विद्वान वकील श्री.कदम यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणामधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.१ हा ता.०४.०१.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. त्यानंतर ता.२१.०६.२०२५ रोजी हुकूमनामाधारकांनी सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब का झाला, याबाबतचे संयुक्तिक स्पष्टीकरण हुकूमनामाधारका तर्फे देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः-**

५. मी वर नमूद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत

**नि.क्र.४४ खालील आदेश**

करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.४४ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.25 11:31:39 +0530

दि.२२.०९.२०२५. (सो.द.घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,

माळशिरस.

**<u>नि.द.क्र.०८/२०१७</u>**

**<u>नि.क्र.४४ खालील आदेश</u>**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.२२.०९.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.२२.०९.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.२२.०९.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.२५.०९.२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.२५.०९.२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर,
माळशिरस.